| | 154.4.24<br>आस्थापना कक्ष | सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देय असलेल्या शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी ठरविणेबाबत...<br>(टिपणी : महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्र. वेतन -1999/ प्र.क्र..2/99/सेवा-3, दि. 20 जुलै 2001 आणि शासन निर्णय क्र. वेतन -1109/प्र.क्र.44/सेवा-3, दि. 1 एप्रिल 2010 अन्वये रु. 15600-39100 पे बॅन्ड + 5400 ग्रेड पे व त्यापेक्षा कमी वेतन घेणाऱ्या शासकिय कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली आहे. सदर शासन निर्णय विदयापीठाला लागू करण्यासाठी व्यवस्थापन मंडळ ठराव क्र.ए-100/2001/103 दि. 24/10/2001 अन्वये मान्यता दिली आहे. विद्यापीठातील अ. ब. क. गटातील अधिकारी/कर्मचारी तसेच एकाकी पदांना 12 व 24 वर्षाच्या सेवेनंतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देय आहे.<br>महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. वेतन -1109/प्र.क्र.41/सेवा-3, दि. 5 जुलै 2010 अन्वये एकाकी पदांना सदर योजना लागू करण्याचा शासन निर्णय जारी केला आहे. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.4 नुसार कर्मचाऱ्याच्या 6 वर्षातील गोपनीय अहवालातील त्याला अनुकुल असलेल्या कोणत्याही 3 गोपनीय अहवालाची सरासरी पहिल्या लाभाच्या प्रकरणी ब (चांगली) व दुसऱ्या लाभाच्या प्रकरणी ब (निश्चित चांगली) असणे आवश्यक राहील. ही सरासरी प्रतवारी प्राप्त न केल्यास तसेच कर्मचारी वैदयकिय अथवा अन्य कारणास्तव अपात्र ठरल्यास त्याला मंजूर करण्यात आलेला यथास्थित पहिला अथवा दुसरा लाभ काढून देण्यात येईल व अशा लाभाची वसुली करण्यात येईल असे नमुद केले आहे.<br>य.च.म.मुक्त विदयापीठाने सन 2013-14 पर्यंत जे गोपनीय अहवालाचे विहित नमुने सर्व शिक्षकेतर अधिकारी कर्मचारी यांचेकडून भरुन घेण्यात येत होते. तो विहित नमुना शासनाने विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे नव्हता. विदयापीठाच्या परिनियमाप्रमाणे वर्गवारी खालीलप्रमाणे होती.<br>1. फार चांगले ही A+     2. चांगले ही A<br>3. बरे ही B+     4. सरासरी ही B<br>5.सरासरीपेक्षा खालचा दर्जा ही C |

| | | |
|---|---|---|
| | | सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेबाबतच्या शासन निर्णय क्र.वेतन -1109 / प्र.क्र.41 / सेवा-3 दि.5 जुलै 2010 अन्वये विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्याना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी वरीप्रमाणे प्रतवारीपैकी बरे ही B+ इतकी किंवा त्याहून अधिक प्रतवारी असलेल्या अधिकरी/कर्मचाऱ्यांना संवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यास मान्यता दयावी ही विनंती अशा स्वरुपाचा लाभ यापूर्वी दि. 12/08/2014 रोजी विद्यापीठ अधिकाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतच्या खातेतंर्गत पदोन्नती समितीने दिली आहे. त्यानुसार सन 2015 व त्यापुढील अधिकरी व कर्मचाऱ्यांना लाभ देण्यास मान्यता दयावी ही विनंती. सदर बाब ही विद्यापीठ परिनियम आणि महाराष्ट्र शासनाने निर्णय यांचेशी संबधित असल्याने मा.कुलगुंरुनी अधिकारी - कर्मचारी यांना खातेतंर्गत पदोन्नती समितीच्या पदोन्नती व सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासाठी वरील प्रतवारीनुसार लाभ देण्यास व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.) (सहपत्र U)<br>**व्य.मं.ठराव: सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देय असलेल्या शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासननिर्णयानुसारच करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 154.4.25<br>आस्थापना कक्ष | शैक्षणिक व प्रशासकीय पदांच्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी निवड समितीत व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशन करावयाच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.<br>(टिपणी - विद्यापीठातील शैक्षणिक प्रवर्गातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, विभागीय संचालक व प्रशासकीय प्रवर्गातील कुलसचिव, वित्त अधिकारी, उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, कक्ष अधिकारी,डाटाप्रोसेसिंग सुपरवायझर, सहायक, वाहन चालक व शिपाई या पदांची जाहिरात दिनांक 5 फेब्रुवारी 2016 रोजी दैनिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली होती. ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दिनांक 18.3.2016 पर्यंत व विद्यापीठात अर्जाची मुळ प्रत सादर करण्यासाठी 23.3.2016 पर्यंत मुदत वाढ वाढविण्यात आलेली आहे. वरील सर्व पदांच्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी निवड समिती गठीत करावी लागणार असून समितीतील सदस्यांचे नामनिर्देशनही करणे आवश्यक आहे.<br>1.शैक्षणिक पदांसाठी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी विद्यापीठाच्या कायदा क्र.20 मधील तरतुद क्रमांक 11 नुसार समिती गठीत करुन समितीत व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशन केलेल्या सदस्यांचे नामनिर्देशन करावे लागणार आहे. (सोबत छायांकित प्रत)<br>2.प्रशासकीय पदांमधील अ व ब प्रवर्गातील पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी विद्यापीठाच्या कायदा क्र.20 मधील तरतुद क्रमांक 14 नुसार समिती गठीत करुन समितीत व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशन केलेल्या सदस्यांचे नामनिर्देशन करावे लागणार आहे. (सोबत छायांकित प्रत)<br>3.कुलसचिव या पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्यासाठी व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी Statute No.6 1993 नुसार समितीचे गठण करावे लागणार असून या समितीमध्ये व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशन केलेल्या सदस्यांचे नामनिर्देशन करावे लागणार आहे. (सोबत छायांकित प्रत)<br>4.वित्त अधिकारी या पदासाठी मुलाखत घेण्यासाठी Finance Officer (Under section 13 of the Act) नुसार समिती गठीत करुन समितीत व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशन केलेल्या सदस्यांचे नामनिर्देशन करावे लागणार आहे. (सोबत छायांकित प्रत)<br>वरील पदांच्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी समितीत व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांमधुन नामनिर्देशत करावयाच्या सदस्यांचे नामनिर्देशन करुन मिळण्यासाठी सदर विषय विचारार्थ.) (सहपत्र V)<br>व्य.मं.ठराव: **(1) शैक्षणिक व प्रशासकीय पदांच्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी निवड समितीत व्यवस्थापन मंडळाने सदस्यांचे नामनिर्देशन करण्या बाबतचे अधिकार मा. कुलगुरु यांना देण्यास मान्यता देण्यात आली.**<br>**(2) कुलसचिव या पदासाठी मुलाखत घेण्यासाठी Statute No.6 1993 नुसार सदर समितीमध्ये व्यवस्थापन मंडळाने सदस्य म्हणून डॉ. सर्जेराव ठोंबरे, औरंगाबाद, डॉ.ज्ञानदेव नाठे, सहसंचालक, तंत्रशिक्षण यांच्यापैकी जे उपलब्ध असतील त्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** |

| | | |
|---|---|---|
| | | **(3) वित्त अधिकारी या पदासाठी मुलाखत घेण्यासाठी Finance Officer (Under section 13 of the Act) नुसार सदर समितीमध्ये व्यवस्थापन मंडळाने सदस्य म्हणून श्री. उल्हास एन.गवळी, औरंगाबाद, डॉ.व्ही.एल.माहेश्वरी यांच्यापैकी जे उपलब्ध असतील त्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** |
| | 154.4.26<br>आस्थापना कक्ष | विद्यापीठातील नियमित सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वयोधिक्य व इतर त्रुटींचे निराकरण करणेबाबत शासनास माहिती सादर करण्याचा मसुदा व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.<br>(टिपणी - अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे पत्र क्रमांक नियुक्ती 2015/(617)/15/विशि-1 दिनांक 28 सप्टेंबर 2015 च्या पत्रात विद्यापीठात नेमणूका देताना वयोधिक्य असलेल्या कर्मचारी अधिकाऱ्यास नियुक्ती देण्यास कोण जबाबदार आहेत. त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार काय कारवाई करण्यात आली आहे. याविषयी खुलासा मागविलेला आहे. उपरोक्त मुद्याची माहिती शासनास देण्यासाठी पुढीलप्रमाणे मसुदा तयार केलेला आहे. नेमणूका देताना वयोधिक्य असलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यास नियुक्ती देण्यास जबाबदार असणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. कारण यासर्व नियुक्त्यांच्या प्रस्तावांना संबंधित निवड समिती, कुलसचिव, कुलगुरु आणि व्यवस्थापन मंडळ यासर्वांची मान्यता असल्याने व विद्यापीठ स्वयंपूर्ण असल्याने कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर माहिती शासनाकडे पाठविण्याचा मसुदा विचारार्थ.) (सहपत्र वेळेवर देण्यात येईल)<br>**व्य.मं.ठराव: सेवानिवृत्त झालेल्या, नजिकच्या काळात सेवानिवृत्त होणाऱ्या व सेवेत असताना मृत्यु पावलेल्या शिक्षक व शिक्षकेतरांच्या नेमणूका ह्या सेवानिवृत्ती वेतन योजना 2006 पासून लागू झाल्यामुळे व त्याआधीच्या नियुक्त्या या विद्यापीठाच्या तत्कालीन कुलगुरु, कुलसचिव व व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने करण्यात आलेल्या होत्या. या नेमणूकांबाबत विद्यापीठाच्या नियमित सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वयोधिक्य, शैक्षणिक अर्हता व इतर त्रुटींचे निराकरण करण्यात यावे. विद्यापीठास महाराष्ट्र शासनाची वेतन योजना लागू नसल्यामुळे व शासनाशी झालेल्या 350 पदांबाबत करारनाम्यानुसार यापूर्वीही कर्मचारी व विद्यापीठ हिश्याच्या रकमा सलगपणे शासन निर्णयातील तरतुदीनुसार मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडे सलगपणे जमा करण्यात आलेले आहे व यापुढेही विद्यापीठ सदर रक्कम जमा करत राहील. भविष्यात विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीसाठी जादा रकमेची आवश्यकता भासल्यास त्याचा भारही विद्यापीठाकडून उचलला जाईल. त्यामुळे विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीसाठी शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नसल्यामुळे विद्यापीठातील 2013 पासून सेवानिवृत्त झालेले, सेवेत असताना निधन झालेले, नजिकच्या काळात सेवानिवृत्त होणारे अधिकारी व कर्मचारी यांची सेवानिवृत्ती व उपदान योजना प्रकरणे मंजूर करण्यात यावीत तसेच विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीसाठी शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नसल्यामुळे विद्यापीठातील 350 कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना प्रकरणे मंजुर करुन मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कार्यालयाऐवजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडूनच महालेखापाल कार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना वरील ठरावानुसार पत्र पाठवून मार्गदर्शन घ्यावे यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 154.4.27<br>आस्थापना कक्ष | श्री.अनुप पुजारी, नियोजन अधिकारी यांच्या स्वेच्छानिवृत्तीबाबतची बाब व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.<br>(टिपणी - श्री.अनुप पुजारी, नियोजन अधिकारी यांनी दि.9.1.2016 रोजी स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज विद्यापीठाकडे पाठविला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 66 नुसार शासकीय कर्मचाऱ्याला त्याची 20 वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती अधिकाऱ्यास तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन सेवेमधून केव्हाही सेवानिवृत्त होण्याची तरतूद |

ਡੀ

| | | |
|---|---|---|
| | | आहे. सदर तरतुदीनुसार श्री.अनुप पुजारी यांना दि.9.4.2016 रोजी सेवानिवृत्त करावे लागेल.<br>श्री.अनुप पुजारी हे नियोजन अधिकारी म्हणून विद्यापीठात दि.28.10.1993 पासून सेवेत आहेत. आतापर्यंत श्री.अनुप पुजारी यांची एकूण सेवा 22 वर्षे 4 महिने झाली आहे. त्यापैकी श्री.पुजारी हे 10 वर्षे 7 महिने अन्य ठिकाणी धारणाधिकार होते.<br>श्री.अनुप पुजारी हे डॉ.हरिसिंह गौर विश्वविद्यालय, सागर, मध्यप्रदेश येथे दि.1.5.2012 ते 30.4.2015 पर्यंत ग्रहणाधिकारावर होते. श्री.अनुप पुजारी यांना डॉ.हरिसिंह गौर विश्वविद्यालय, सागर, मध्यप्रदेश यांनी दि. 28.4.2015 रोजी कार्यमुक्त केले आहे. तत्पुर्वी, श्री.पुजारी वैद्यकिय कारणास्तव रजेवर असल्याने त्यांना विद्यापीठ सेवेत रूजु होण्यासाठी सक्षम असल्याबाबतचे नोंदणीकृत वैद्यकिय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत व नादेय प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविले होते. यासंदर्भातील सविस्तर सहपत्र सोबत जोडले आहे. सहपत्रात नमूद केलेल्या प्रस्तावित मुद्यांनुसार श्री.अनुप पुजारी यांच्या स्वेच्छानिवृत्तीबाबतचा निर्णय घेणेबाबत व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ.) (सहपत्र W)<br>**व्य.मं.ठराव: श्री.अनुप पुजारी, नियोजन अधिकारी यांनी दि. 9.1.2016 रोजी दिलेली स्वेच्छानिवृत्तीची लेखी स्वरुपातील नोटीस मान्य करण्यात आली.** |
| 154.5.0 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय** |
| | 154.5.1 | उत्तरपुस्तिका निर्लेखन (निकाली) करण्याबाबतची बाब विचारार्थ<br>(टिपणी - विद्यापीठामार्फत प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, संशोधनपर शिक्षणक्रम इत्यादी स्तरावरील शिक्षणक्रम राबविले जातात. यासर्व शिक्षणक्रमाच्या प्रत्येक वर्षी अंतिम व पुरवणी परीक्षा आयोजित केल्यानंतर जवळपास वर्षभरात 50 लाख उत्तरपुस्तिका असतात. या मोठ्याप्रमाणावरील उत्तरपुस्तिकांचे जतन करण्यासाठी वेळोवेळी पुरेशी जागाही उपलब्ध करणे अनिवार्य असते. श्री राजेश अगरवाल परीक्षा सुधार समितीनुसार परीक्षा आयोजन आणि केंद्रिय मूल्यमापन प्रक्रियेत बदल केलेले आहेत. त्यानुसार नोव्हेंबर 2015 पासून झालेल्या परीक्षेच्या उत्तरपुस्तिकांचे मूल्यमापन डिजिटल पध्दतीने करुन घेण्यात आलेले आहे. या उत्तरपुस्तिकांची स्कॅन कॉपी कार्यालयाच्या दप्तरी उपलब्ध आहे. विद्यापीठाच्या नवीन धोरणानुसार विद्यार्थ्याला त्याच्या मागणीनुसार उत्तरपुस्तिकांची स्कॅन कॉपी देण्याबाबतचे नियम केलेले आहे. प्रत्येक वर्षी जमा होणाऱ्या उत्तरपुस्तिका ठेवण्याची गैरसोय असल्याकारणाने शिक्षणक्रमनिहाय उत्तरपुस्तिकांचे निर्लेखन करणे अनिवार्य आहे. त्यासाठी परीक्षेचा निकाल लागल्यापासून सर्व (प्रमाणपत्र) पदविका, पदव्युत्तर पदवी, पदविका संशोधनपर शिक्षणक्रमांच्या उत्तरपुस्तिकांचे निकाल लागल्यापासून 2 महिन्यापर्यंत जतन करावे. त्यानंतर लगेच या उत्तरपुस्तिकांचे निर्लेखन करावे असे वाटते. ज्या शिक्षणक्रमांच्या उत्तरपुस्तिकांचे स्कॅनिंग करुन डीजीटल कॉपी विद्यापीठाकडे आहे. अशाच उत्तरपुस्तिकांचे निर्लेखन (weed out) त्या त्या परीक्षेचा निकाल लागल्यापासून दोन महिन्यानंतर लगेच करण्याबाबतच्या धोरणात्मक निर्णयाकरिता व्यवस्थापन मंडळापुढे सदरचा प्रस्ताव विचारार्थ)<br>**व्य.मं.ठराव: ज्या शिक्षणक्रमांच्या उत्तरपुस्तिकांचे स्कॅनिंग करुन डीजीटल कॉपी विद्यापीठा कडे आहे. अशाच उत्तरपुस्तिकांचे निर्लेखन (weed out) त्या त्या परीक्षेचा निकाल लागल्यापासून दोन महिन्यानंतर लगेच करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 154.5.2 | शैक्षणिक व प्रशासकीय रिक्त पदे जाहिरातीबाबतची बाब विचारार्थ<br>(टिपणी - विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय रिक्त पदांची जाहिरात देण्यास मा. कुलगुरूंनी दि. 20.10.2015 च्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार मान्यता दिलेली आहे. परिशिष्ट -1<br>विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय रिक्त पदे भरती संदर्भात सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून विद्याशाखा संचालक व प्रशासकीय विभाग प्रमुख यांचेकडून पदे भरतीसंदर्भात काही आक्षेप/सूचना असल्यास त्या कुलसचिवांकडे कळविण्यासंदर्भात परिपत्रक काढण्यास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली होती. त्यानुसार परपत्रक जा.क्रं.आस्था/2015/988 दिनांक 21.10.2015 रोजी परिपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते. परिशिष्ट -2<br>विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय रिक्त पदांची जाहिरातदेण्या संदर्भात आरक्षण कक्षाचे पत्र क्रं. RCell-003/2015 दिनांक 17.11.2015 च्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार जाहिरातीचा मसुदा तयार करण्यात आलेला होता. त्यानुसार दिनांक 19.11.2015 च्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार विद्यापीठातील रिक्त पदांची जाहिरात देण्यास मान्यता देण्यात आली. (सोबत जाहिरातीचा मसुदा) परिशिष्ट -3 |

| | | |
|---|---|---|
| | | मा. कुलगुरूंनी दि. 7.12.2015 च्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार शैक्षणिक पदांची भरती युजीसी,विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र कृषी विद्यापीठ परिनियम, वैद्यकीय शिक्षण परिषद यांच्यामध्ये नमुद केल्यानुसार शैक्षणिक अर्हता व अनुभवात बदल करण्यास मान्यता दिली. तसेच प्रशासकीय पदांसाठी विद्यापीठाच्या अ,ब,क व ड मसुदा परिनियमानुसार शैक्षणि"क' अर्हता व अनुभवास मान्यता दिली व त्यानुसार सुधारित मसुदा व जाहीरातीच्या माहिती पत्रकास मान्यता देण्यात आली. परिशिष्ट -4<br>तसेच आरक्षण कक्षाचे पत्र क्रं. RCell-003/2015 दिनांक 21.12.2015 व दिनांक 4.1.2016 च्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार जाहिरातीचा मसुदा तयार करण्यात आलेला होता.<br>विद्यापीठाच्या सध्याच्या कुलसचिवांची मुदत दि. 30 जून 2016 रोजी संपुष्ठात येत असुन निवड प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी लक्षात घेता मा. कुलगुरूंनी सदरच्या पदाचा जाहीरातीत समावेश करण्याचा निर्णय घेतला. तसेच विद्यापीठातील वित्त अधिकारी पदासाठी मा. कुलपतींच्या उपसचिवांनी दिनांक 4 सप्टेंबर 2007 च्या परिनियम परिशिष्ट -5 पत्रान्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या दि. 15 मार्च 2007 च्या बैठकीतील मसुदा परिनियम क्रं. 1 (2007) ला मान्यता दिली आहे. त्यानुसार आत्तापर्यंत विद्यापीठाने या परिनियमानुसार वित्त अधिकाऱ्याचे पूर्ण वेळ पद भरलेले नसुन वित्त अधिकाऱ्याचे पद महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडून प्रतिनियुक्तीने आलेल्या अधिकाऱ्यामधून किंवा विद्यीपठाच्या कुलसचिवांकडे अतिरिक्त कार्यभार देवून आत्तापर्यंत भरण्यात आलेले आहे. मा. कुलगुरूंनी विद्यापीठातील परनियमानुसार वित्त अधिकारी पदाचा जाहीरातीत समावेश करण्याचा निर्णय घेतला व दि. 22.12.2015 च्या अंतर्गत संज्ञापन पत्रान्वे कुलसचिव, वित्त अधिकारी, उपकुलसचिव व सहायक कुलसचिव या पदांची जाहीरात देण्यास व त्यासाठीची शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यास मान्यता दिली.परिशिष्ट -6 यानंतर मा. कुलगुरूंनी विद्यापीठातील कुलसचिव आणि वित्त अधिकारी या पदांचाही जाहीरातीत समावेश करण्याचा निर्णय घेतला व दिनांक 8.1.2016 च्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार कुलसचिव आणि वित्त अधिकारी या पदांची जाहिरात देण्यास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. (सोबत अंतर्गत संज्ञापन पत्र व जाहिरातीचा मसुदा) परिशिष्ट -7<br>उपरोक्त निर्णयानुसार विद्यापीठाने दिनांक 4 फेब्रुवारी 2016 रोजी दैनिक वर्तमानपत्रातून शैक्षणिक व प्रशासकीय पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आला. ऑन लाईन अर्ज भरण्याची मुदत 10.2.2016 ते अंतिम मुदत दिनांक 10 मार्च 2016 पर्यंत दिलेली होती व विद्यापीठात अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक 15.3.2016 निश्चित करण्यात आलेली होती. परंतु इच्छुक उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी व ऑन लाईन पेमेंट करण्यासाठी अडचणी येत असल्यामुळे मा. कुलगुरूंच्या मान्यतेनुसार ऑन लाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक 18 मार्च 2016 पर्यंत वाढविण्यात आली होती व विद्यापीठात अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक 23.3.2016 पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. झालेली जाहिरात परिशिष्ट -8 संकेतस्थळावर देण्यात आलेली माहिती परिशिष्ट -9 आणि मुदत वाढीबाबतची मान्यता परिशिष्ट -10 वर्तमान पत्रात माहीती परिशिष्ट -11 देण्यात आली व संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली मुदतवाढीबाबतची माहीती परिशिष्ट -12 व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ)<br>**व्य.मं.ठराव: शैक्षणिक व प्रशासकीय रिक्त पदाच्या जाहिरातीबाबत व त्यासंदर्भात विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहींची नोंद घेण्यात आली.** |
| | 154.5.3 | विद्यापीठातील नियमित सेवेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी याच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमाबाबत<br>(टिपणी – विद्यापीठात काम करणारा नियमित सेवेतील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी हा विद्यापीठाचा महत्वाचा घटक असतो. त्याने विद्यापीठात केलेले काम, विद्यापीठास दिलेले योगदान यामुळेच विद्यापीठाची प्रगती झालेली असते. विद्यापीठ सेवेत काम करीत असताना तो आपुलकीच्या भावनेने काम करीत असतो. परंतु निवृत्तीनंतर हीच भावना जोपासली जावी यासाठी विद्यापीठामार्फत सोवानिवृत्तीच्या दिवशी पुढील नमूद केलेल्या बाबी करण्यात याव्यात असे वाटते. (१) सेवानिवृत्तीच्याच दिवशी विद्यापीठामार्फत सत्कार व निरोप समारंभाचे आयोजन करण्यात यावे. सेवानिवृत्तीचा कार्यक्रम सेवानिवृत्तीच्याच दिवशी दुपारी 3 ते 5 या वेळेतच विद्यापीठात आयोजित करण्यात यावा. कार्यक्रमासाठी विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना बोलविण्यात यावे. सर्वासाठी चहा व नाष्ट्याची व्यवस्था करण्यात यावी. (२) सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तीस विद्यापीठामार्फत रु.2500/- पर्यंतचे स्मृतीचिन्ह, शाल श्रीफळ, |

31.

| | | |
|---|---|---|
| | | पुष्पगुच्छ व मानपत्र देवून तसेच सत्कार करण्यात यावा. यासाठी अंदाजे खर्च रु.3000/- खर्च अपेक्षित आहे. (३) सेवानिवृत्तीच्या दिवशी संबंधित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यास सन्मानाची वागणूक मिळावी यासाठी त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना विद्यापीठाने आयोजित केलेल्या कार्यक्रमास जाण्यायेण्यासाठी विद्यापीठाची वाहन व्यवस्था करण्यात यावी. (४) सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमाचे संपूर्ण व्हिडीओ शुटींग करण्यात येवून त्याची आठवण म्हणून संबंधिताना कार्यक्रमाची एक डी.व्ही.डी तसेच फोटो काढण्यात येवून अल्बम भेट देण्यात यावा. (५) सेवानिवृत्तीच्या दिवशी शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना अर्जित रजेच्या रोखीकरणाचा धनादेश (नियमानुसार देय असलेल्या रक्कमेचा) देण्यात यावा.सदर बाब विचारार्थ सादर)<br>**व्य.मं.ठराव: विद्यापीठातील सेवानिवृत्त होणाऱ्या नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना सेवानिवृत्तीच्यावेळी विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात यावा. यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 154.5.4 | सन 2016-17 एनएसएस उपक्रम रु.10 लक्ष तरतूदीची बाब विचारार्थ सादर<br>(टिपणी - सन 2016-17 साठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांचे आयोजन सेल्फ सपोर्ट युनिटच्या अनुदान, वार्षिक अहवाल छपाई, प्रवास खर्च, सल्लागार समिती व कार्यक्रम अधिकारी यांच्या बैठकीच्या नियोजनासाठी रु. 10 लाख तरतूद आवश्यक असल्याने सदर बाब विचारार्थ सादर)<br>**व्य.मं.ठराव: सन 2016-17 साठी राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) उपक्रमांचे आयोजना साठी विद्यापीठाच्या वार्षिक अंदाजपत्रकात सन 2016-17 मध्ये रु.10 लक्ष तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 154.5.5 | 2005 नंतर विद्यापीठ सेवेत आलेले शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी यांच्या निवृत्ती वेतनाबाबत<br>(टिपणी - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला वेतन अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे विद्यापीठ शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांना शासनाची सेवा निवृत्ती वेतन योजना लागू नव्हती. दिनांक 19 ऑक्टोबर 2005 च्या शासन निर्णय क्र. वायएमयु 1202/154/02)/विशि 2 अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शासनमान्य पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीवेतन व उपदान योजना लागू करणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशानुसार विद्यापीठ व महाराष्ट्र शासन यांच्यात दिनांक 30 मे 2006 रोजी करार करण्यात आला. या करारनाम्यातील तरतूद क्र. (i) नुसार विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या अंशदायी भविष्य निर्वाह निधीची आणि विद्यापीठाच्या हिश्श्यासह 2005 पूर्वीच्या कालावधीत जमा झालेली रक्कम रु. 4.00 कोटी एक रकमी अधिक प्रतिवर्षी रु.24.00 लाख एवढी रक्कम किंवा कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या 8.33 टक्के प्रमाणे अंशदायी भविष्य निर्वाह निधीचे विद्यापीठाचे अंशदान यापैकी अधिक असणारी रक्कम, प्रतिवर्षी विद्यापीठ शासनाकडे जमा करेल, तो पर्यंत या विद्यापीठातील शासनमान्य 350 पदांना राज्य शासनातर्फे सेवानिवृत्ती वेतन योजना व उपदान योजना लागू करण्यात आलेला आहे.<br>या करारनामा व शासन निर्णयानुसार विद्यापीठाने दिनांक 21.8.2006 रोजी डिडि क्र. 40688 अन्वये रु. 4.00 कोटी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडे जमा केलेले आहेत. तसेच सप्टेंबर 2006 पासून आतापर्यंत दरमहा कर्मचाऱ्यांचा भ.नि.नि. चा हिस्सा 6 टक्के आणि विद्यापीठाचा निवृत्ती वेतनाचा हिस्सा 8.33 टक्के इतका शासनाच्या भविष्य निर्वाह निधी खाते प्रधानशीर्ष 8336 नागरीठेवी 800 इतर ठेवी प्रतीभूती ठेवी (00) (09) अर्थसहाय्यित अकृषि विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना अंशदानात्मक सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी (8336 5094) मध्ये जमा करण्यात येत आहे. सोबत आतापर्यंत जमा केलेल्या वर्षनिहाय रकमेची यादी जोडलेली आहे.<br>या विद्यापीठात 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत शासनाच्या वित्त विभागाने शासननिर्णय क्र. अंनियो-2015/(NPS)/ प्र.क्र.32 / सेवा-4 दिनांक 6 एप्रिल 2015 मधील तरतूद क्र. 54 अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी लागू करावयाच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन (NPS) योजनेच्या कार्यपद्धतीबद्दल या विद्यापीठास वेतन योजना लागू नसल्यामुळे स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करावा. या योजनेसाठीचा आर्थिक भार संपुर्णतः विद्यापीठ स्वीकारेल.<br>"या करारानाम्यानुसार यापूर्वीही कर्मचारी व विद्यापीठ हिश्श्याच्या रकमा सलगपणे जमा करण्यात आलेल्या आहेत व यापुढेही विद्यापीठ सदर रक्कम जमा करीत राहील. भविष्यात विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीसाठी ज्यादा रकमेची आवश्यकता भासल्यास त्याचा भारही |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठाकडून उचलला जाईल. त्यामुळे विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीसाठी शासनावर कोणताही भार पडणार नसल्यामुळे विद्यापीठातील 350 कर्मचाऱ्याची सेवानिवृत्ती प्रकरणे मंजूर करावीत ही बाब व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.)<br>**व्य.मं.ठराव: 2005 नंतर विद्यापीठ सेवेत आलेले शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी यांच्या निवृत्ती वेतनाबाबत दिनांक 19 ऑक्टोबर 2005 च्या शासन निर्णय क्र. वायएमयु 1202/154/02)/विशि 2 अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शासनमान्य पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीवेतन व उपदान योजना लागू करणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशानुसार विद्यापीठ व महाराष्ट्र शासन यांच्यात दिनांक 30 मे 2006 रोजी करार करण्यात आला. या करारनाम्यातील तरतूद क्र. (i) नुसार यापूर्वीही कर्मचारी व विद्यापीठ हिश्श्याच्या रकमा सलगपणे जमा करण्यात आलेल्या आहेत व यापुढेही विद्यापीठ सदर रक्कम जमा करीत राहील. भविष्यात विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीसाठी ज्यादा रकमेची आवश्यकता भासल्यास त्याचा भारही विद्यापीठाकडून उचलला जाईल. त्यामुळे विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीसाठी शासनावर कोणताही भार पडणार नसल्यामुळे विद्यापीठातील 1 नोव्हेंबर 2005 नंतर लागलेल्या शिक्षक व शिक्षकेतरांसाठी राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू करण्यास मान्यता देण्यात आली व यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाला प्राधिकृत करावे याबाबत महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांना पत्र पाठवून मार्गदर्शन घ्यावे यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 154.5.6 | विद्यापीठाने सन 2008 मध्ये करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याबाबत<br>(टिपणी- महाराष्ट्र शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.वायएमयु-2013 (41/13) विशि-1 दि.25.2.2014 अन्वये सहायकांची 50 पदे व शिपाई 21 अशी एकूण 71 पदे मंजुर केली आहेत. (परिशिष्ट 1)<br>महाराष्ट्र शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र.वायएमयु-2013 (41/13) दिनांक 25.2.2014 अन्वये विद्यापीठाने सन 2008 मधे करार पद्धतीने नियुक्त केलेल्या 17 कर्मचाऱ्यांनी विद्यापीठ सेवेत सामावून घेण्यास मान्यता दिली आहे. (परिशिष्ट 2)<br>सदर शासननिर्णय दि. 29.11.2014 रोजीच्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्याबाबत व्यवस्थापन मंडळाने ठराव क्र.146-4-21 अन्वये खालीलप्रमाणे ठराव केला आहे.<br>"शासन आदेशान्वये सुरूवातीपासून झालेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मा.कुलसचिव यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या उमादेवी विरूद्ध स्टेट ऑफ कर्नाटक यांच्या जजमेंटनुसार व विविध न्यायालयाच्या निर्णयानुसार विद्यापीठास नव्याने मंजूर झालेल्या 71 पदांची कार्यवाही करताना सर्व 71 पदांची जाहिरात देण्यात यावी. 17 पदे भरताना उद्भणाऱ्या सर्व अडचणींची माहिती महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागास पत्राने कळवून जाहिरातीद्वारे पदे भरण्यास परवानगी मागवून त्यानंतर कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात आली. (परिशिष्ट 3)"<br>यासंदर्भात विद्यापीठाने मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.23.2.2015 रोजी मार्गदर्शन करणेबाबत व 17 पदे भरताना उद्भवणाऱ्या अडचणी पत्राद्वारे कळविण्यात आल्या होत्या. (परिशिष्ट 4)<br>तसेच या 17 कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सिव्हिल रिट पिटीशन क्र.33628 (2014 चा) अन्वये याचिका दाखल केली होती. ही याचिका मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.15.1.2015 रोजी याचिकाकर्त्याच्या वकिलांनी withdraw करणेच्या विनंतीनुसार याचिका निकाली (disposed) काढली आहे.<br>विद्यापीठाने शासनाला दिनांक 6.8.2015 रोजी पहिले स्मरणपत्र (परिशिष्ट 5), दिनांक 9.9.2015 रोजी दुसरे स्मरणपत्र (परिशिष्ट 6), दिनांक 1.10.2015 रोजी तिसरे स्मरणपत्र (परिशिष्ट 7) पाठविले आहे.<br>महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांच्या दिनांक 1.1.2016 रोजीच्या पत्रात दि. 25.2.2014 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पदे निर्माण करून व दि. 25.2.2014 रोजीच्या पत्रान्वये 17 कर्मचाऱ्यांना विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेण्यास मान्यता देण्यात आल्याचे व |

| | | |
|---|---|---|
| | | त्यानुसार प्रक्रिया अवलंबून पुढील आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. (परिशिष्ट 8)<br>सदर पत्राबाबत विद्यापीठाने मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.3.2.2016 रोजी भविष्यात उद्भवणाऱ्या गंभीर समस्यांबाबत सविस्तर पत्र पाठविले आहे. (परिशिष्ट 9)<br>या पत्रात विद्यापीठातील सेवानिवृत्त झालेल्या व सन 2016 मधे सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कार्यालयाकडून त्रुटी काढल्याने प्रलंबित आहेत. याबाबतची सविस्तर माहिती कळविण्यात आली व सद्यस्थिती 17 कर्माचाऱ्यांना विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेणेबाबत खालील पाच अडचणींची भर पडली असे कळविण्यात आले आहे.<br>या पत्राच्या शेवटच्या परिच्छेदात वरील सर्व अडचणी विचारात घेऊन नवीन निर्माण झालेली सर्व सरळसेवेची पदे जाहिरातीद्वारे व विद्यापीठाच्या गरजेनुसार भरण्याबाबत मान्यता द्यावी अशी विनंती शासनास करण्यात आली व त्यापुढे यासर्व बाबींचे निराकरण झाल्यानंतर पदभरतीबाबत विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळापुढे प्रस्ताव सादर करता येईल यास मान्यता असे कळविण्यात आले. मात्र, याबाबत शासनाचे अद्यापि मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.<br>वरील सर्व 71 पदांचा विचार करता, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण 2015/प्रक्र 57/2015/विशि 1 दि. 14.1.2016 अन्वये लिपीक संवर्गात गट ड कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने भरावयाची मर्यादा संवर्ग संख्येच्या 25 टक्क्यांवरून 50 टक्क्यांपर्यंत करण्यात आली आहे. (परिशिष्ट 10) त्यामुळे दि. 25.2.2014 रोजीच्या शासन निर्णयातील सहायकांच्या मंजुर 50 पदांपैकी 25 पदे ही शिपाई संवर्गातून पदोन्नतीसाठी उपलब्ध राहतील व उर्वरित 25 सहायकांची पदे सरळसेवा भरतीने भरण्यास मान्यता द्यावी असे शासनास कळविण्यात आले.<br>सदर पत्र विद्यापीठात प्राप्त झाल्यानंतर करारावरील 17 कर्मचाऱ्यांनी दि.18.1.2016 रोजी विद्यापीठ सेवेत सामावून घेणेबाबत विनंती पत्र दिले आहे. त्यानंतर त्यानंतर दिनांक 12.2.2016 रोजी पहिले स्मरणपत्र, दिनांक 22.2.2016 रोजी दुसरे स्मरणपत्र, दिनांक 8.3.2016 रोजी तिसरे स्मरणपत्र पाठविले आहे.<br>मा.कुलगुरूंनी सदर प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयार्थ सादर करण्यासाठी मान्यता द्यावी ही विनंती.)<br>**व्य.मं.ठराव: विद्यापीठाने सन 2008 मध्ये करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्या बाबत दि. 29.11.2014 च्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. 146.4.21 नुसारच कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात विद्यापीठाने मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय, यांना दि. 23.2.2015 व दि. 3 .2.2016 रोजी पाठवलेल्या पत्रात भविष्यात उदभवणाऱ्या गंभीर समस्या याबाबत पाठवलेल्या पत्रांची नोंद घेण्यात आली. व त्यानुसार पुन्हा याबाबत सविस्तर पत्र पाठवून लेखी मार्गदर्शन घ्यावे यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 154.5.7 | यशवंतराव चव्हाण स्मृती संग्राहलयाबाबतची बाब विचारार्थ सादर<br>(टिपणी - विद्यापीठ प्रांगणात नव्याने साकारलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती संग्राहलयाचे उदघाटन 12 मार्च 2016 रोजी मा.खा. शरदचंद्र पवार यांच्या हस्ते झाले. सदरच्या स्मृती संग्राहलयात कै.यशवंतराव चव्हाण यांच्या विविध स्मृतीचे दालन असून त्याची देखभाल करणे आवश्यक आहे. तसेच स्मृती संग्राहलय लोकांसाठी खुले ठेवण्यासाठी मानव्यविद्या विद्याशाखेकडे हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. सदरचे स्मृती संग्राहलय अद्यावत ठेवणे व त्याबाबत निर्णय घेण्यासाठी एक कार्यकारी समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्यामध्ये विद्यापीठाचे मा. कुलगुरु हे अध्यक्ष असतील व सदस्य म्हणून कुलसचिव, व्यवस्थापन मंडळाचे दोन सदस्य, संग्राहलय तज्ञ डॉ. सुनिलकुमार लवटे, बाहेरील दोन तज्ञ, कार्यकारी अभियंता व मानव्यविद्या विद्याशाखेचे संचालक यांचा समावेश असावा. यापुढे सदर संग्रहालायत यशवंतराव चव्हाण स्मृती संग्रहालय असे नामकरण करण्यासही मान्यता मिळण्यासाठी सदरची बाबत विचारार्थ)<br>**व्य.मं.ठराव: (१) यशवंतराव चव्हाण स्मृती दालनाचे नामकरण यशवंतराव चव्हाण स्मृती संग्राहलय असे करण्यास.**<br>**(२) या संग्राहलयाची संपूर्ण जबाबदारी विद्यापीठातील मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्याकडे देण्यास.** |

| | | |
|---|---|---|
| | | (३) यशवंतराव चव्हाण स्मृती संग्राहलयाकरिता खालील कार्यकारी समितीचे गठन करण्यास - मा. कुलगुरु, अध्यक्ष, कुलसचिव, वित्त अधिकारी, डॉ. सुनिलकुमार लवटे, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य श्री.हेमंत टकले, जे.जे.स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथील अधिष्ठाता, इलिफिस्टन कॉलेज, मुंबई येथील प्राध्यापक, विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता आणि मानव्यविद्या विद्याशाखेचे संचालक यासर्वांची सदस्य म्हणून नेमणूक करण्यात मान्यता देण्यात आली. |

सचिव
व्यवस्थापन मंडळ

अध्यक्ष
व्यवस्थापन मंडळ